Kvisoft PDF Merger DEMO : Purchase from www.kvisoft.com to remove the watermark

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## पदव्युत्तर शैक्षणिक विभाग

एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

जा. क्र./गोवि/पशैवि/ 7003

दि. ०८/०४/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य /मा. विभागप्रमुख
संलग्नीत महाविद्यालये गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्र
आणि पदव्युत्तर शै. विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषयः– विद्यापीठस्तरीय निंबध स्पर्धेचे आयोजनाबाबत.**

महोदय,

वरील विषयानुसार कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांची लेखन/वाचनशैली वृध्दिगत करून देण्याच्या उद्देशाने पदव्युत्तर शैक्षणिक जनसंवाद विभाग व आदिवासी संशोधन विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्य निंबध स्पर्धेचे आयोजन केले आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील तसेच पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी करावे ही विनंती.

Dr. Shriram S. Kawale
Pro-Vice-Chancellor
Gondwana University Gadchiroli

डॉ. रजनी वाढई
समन्वयक
पदव्युत्तर शैक्षणिक जनसंवाद विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## पदव्युत्तर शैक्षणिक जनसंवाद विभाग
तथा
## आदिवासी संशोधन आणि विकास केंद्र
द्वारा आयोजित



# विद्यापीठस्तरीय आंतरमहाविद्यालयीन निबंध स्पर्धा



## गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आयोजक

---

डॉ. रजनी वाढई
समन्वयक
जनसंवाद विभाग
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली



आपल्याला कळविण्यात आनंद होत आहे की भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन 75 वर्ष पूर्ण होत आहे, तसेच 11 एप्रिल 2022 ला महात्मा ज्योतिबा फुले व 14 एप्रिल 2022 डॉ.बाबसाहेब आंबेडकर जयंती या निमित्य पदव्युत्तर शैक्षणिक जनसंवाद विभाग व आदिवासी संशोधन व विकास केंद्र,गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली येथे विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करीत आहे.या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्याचा उद्देश हाच आहे की ज्या थोर पुरुषांनी समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत समाजाला प्रकाशाची वाट दाखवत एक नवीन दृष्टीकोन निर्माण करून दिला.अशाच थोर पुरुषांची ओळख विध्यार्थ्यांना व्हावी,त्यांच्या कार्याची माहिती कळावी व त्यांच्या मध्ये समाजाविषयी जागरूकता निर्माण होऊन जबाबदारी ची भावना निर्माण व्हावी तसेच आजच्या काळात वाचनाची आवड कमी होत आहे ती पुन्हा जागृत व्हावी या उद्दात्त हेतूने ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे

## निबंध स्पर्धेचे विषय

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य.
2. महात्मा फुले विचारातील शेतकरी प्रश्न,कारणे व उपाय.
3. आधुनिक भारतातील पाहिले शिक्षणतज्ञ :ज्योतिराव गोविंदराव फुले.
4. महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणावरील कार्य.
5. महात्मा फुले यांचे भारतीय समाज व सत्यशोधक समाजातील योगदान.
6. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक न्याय.
7. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जात,वर्ग,आणि आर्थिक विषमता यावरील दृष्टीकोण.
8. डॉ. आंबेडकरांची राष्ट्र उभारणीतील भूमिका.
9. डॉ.आंबेडकर आणि बौद्ध धर्म.
10. डॉ.आंबेडकर आणि कामगार सुधारणा.
11. महात्मा फुले व डॉ.आंबेडकर यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान.
12. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता

### पारितोषिके

प्रथम पुरस्कार रु 2000/-व सन्मानचिन्ह

द्वितीय पुरस्कार रु1500/-व सन्मानचिन्ह

तृतीय पुरस्कार रु1000/-व सन्मानचिन्ह

उत्तेजनार्थ पारितोषिक रु 500/- व सन्मानचिन्ह

## निबंध स्पर्धेचे नियम व अटी

1.ही निबंध स्पर्धा पदवी/ पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.
2.निबंधाची शब्द मर्यादा कमित-कमी 500 ते 1000 शब्दांमध्ये असावा.
3.निबंध ए फोर (A4 size झेरॉक्स पेपर) साईज पांढर्या स्वच्छ कागदावर लिहिलेला असावा.
4.मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तिन्ही भाषांमध्ये निबंध स्वीकारल्या जाईल.
5.लेखी निबंध स्वीकार केले जाईल.
6.निबंध लिहून झाल्यानंतर सगळ्यात शेवटी त्याच कागदावर आपले स्वत:चे पूर्ण नाव, वर्ग, महाविद्यालयाचे आणि विद्यापीठाचे पूर्ण नाव न चुकता लिहणे आवश्यक आहे.
7.सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जातील.
8.परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांवर बंधनकारक राहील.
9.निबंध स्विकारण्याची अंतिम तारीख 25 एप्रिल 2022 आहे.
10. 25 एप्रिल 2022 सांयकाली 6 नंतर आलेले निबंध स्वीकारले जाणार नाही.
11.निबंध स्पर्धेचे निकाल जाहीर होत पर्यंत स्पर्धक आपले निबंध इतर कुठेही अगदी फेसबुकवर देखील प्रकाशित करू शकणार नाही.
12.निबंधावर कोणाचा आक्षेप आल्यास त्याला स्पर्धा संयोजक जबाबदार असणार नाही.
13. विजेत्यांचा निकाल विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
14. निबंध जमा करण्यापूर्वी सर्वांनी आपली नोंदणी करावी.नोंदणी लिंक पुढील प्रमाणे आहे.

https://forms.gle/HMvW73GDL4WcnJCE7


सह-समन्वयक

वैभव मसराम
समन्वयक
आदिवासी संशोधन आणि विकास केंद्र
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

आयोजन समिती

रूपाली आलोने - ८६६८८२०७२८
वर्षा कोल्हे - ९०११०६८७१३